


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७९२. वा मंगळवार दि. ०४ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# लोकसभा निवडणूक देशाच्या भवितव्याला कलाटणी देणारा निकाल कोणाच्या बाजूने?

वृत्तसंस्था/नवी दिल्ली

स्थित्यंतराच्या एका निर्णायक टप्प्यावर उभ्या असलेल्या या देशाच्या १८ व्या लोकसभेच्या निवडणुकीचा निकाल भवितव्याला कलाटणी देणारा असणार आहे.अंदाज, अनुमानं वर्तवली गेली असली आणि परस्परविरोधी दावे आत्मविश्वासानं केले गेले असले, तरीही, मोठ्या चुरशीनं आणि ताकदीनं ही निवडणूक लढली गेली.या निवडणुकीत लोकसभेच्या ५४३ जागांसाठी देशभरात एकूण ६४.२ कोटी मतदारांनी मतदान केलं. विविध प्रांतात विविध पक्ष यांनी आपापल्या उमेदवारांना संधी दिली. ही निवडणूक दोन आघाड्यांमध्ये झाली. एका बाजूला भाजपाप्रणित एनडीए आणि दुसऱ्या बाजूला काँग्रेसप्रणित इंडिया आघाडी. या दोन ध्रुवांमध्ये देशातला बहुतांश मतदार विभागला गेला होता. प्रचारात दोन्ही बाजूंनी गाठल्या गेलेल्या टीपेच्या आवाजानं मतदारांना आपल्याकडे ओढण्याचे प्रयत्न केले. त्यासाठी कधी धार्मिक ध्रुवीकरण घडवून आणणारी वक्तव्यं झाली, तर कधी जातींच्या अस्मितांना जागं करण्याचे प्रयत्न झाले. कोरोनाकाळाच्या संकटातून उभी राहणारी भारतीय अर्थव्यवस्था आव्हानात्मक परिस्थितीतून जात असतांनाही, दोन्ही बाजूंनी समाजातल्या विविध घटकांसाठी थेट आर्थिक मदतीच्या योजनांची मांडणीही करण्यात आली. विकसित भारत चा चढा आवाज असतानाही ही निवडणूक गेल्या काही वर्षांत गंभीर होत गेलेल्या महागाईच्या आणि बेरोजगारीच्या वाढलेल्या आकड्यांच्या काळात झाली, हे वास्तव सत्ताधारीही नाकारू शकणार नाहीत. त्यामुळे २०१४ आणि २०१९ या दोन्ही सलग निवडणुकांमध्ये बहुमताचं सरकार स्थापन करणारा आणि यंदा विक्रमी ४०० पारचा नारा देणारा भाजपा, दहा वर्षांच्या अँटी इन्कंबन्सी तोंड कसा देतो, याकडे सगळ्यांच लक्ष आहे. या निवडणुकीच्या तोंडावर काही अशा नव्या राजकीय रचना तयार झाल्या, ज्यानं निवडणुकीचं मैदान बदललं. त्यातल्या काही मतदारांना गोंधळात टाकणाऱ्या होत्या, तर काही कमी आवाज असलेल्या, कमी संख्येच्या मतदारांना आवाज देणाऱ्या होत्या. या नव्या राजकीय रचनांचा परिणाम निकालांवर होणं अपेक्षित आहे. या निवडणुकीचे निकाल ठरवतील की गेल्या दशकभरात भारतीय राजकारणानं, भारतीय धोरणाने जी दिशा पकडली ती तशीच राहील की त्यात काही बदल होईल. तीन दशकांच्या आघाड्यांच्या राजकारणानंतर अवतरलेलं बहुमताचं दशक तसंच आणखी पुढे अजून एका पंचवार्षिकाकडे जाईल की, एकहाती बहुमतापेक्षा बळकट विरोधी पक्षही लोकशाहीत हवा, असं भारतीय जनमत आहे, हेही समजेल. ते जनमत मतपेटीतून कसं प्रगट होतं, यावर भारतीय लोकशाहीचा पुढचा प्रवास अवलंबून आहे. म्हणून २०२४ ची निवडणूक एवढी महत्वाची, ऐतिहासिक ठरते आहे. या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी अशा एका विक्रमाला गवसणी घालू इच्छिताहेत जो अगोदर केवळ एकाच भारतीय पंतप्रधानाने केला आहे. तो आहे पंतप्रधानपदाच्या हॅटट्रिकचा. याअगोदर देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनाच ते साध्य करता आलं आहे. मोदी या निवडणुकीत सलग तिस-यांदा जिंकून हा विक्रम करु पाहताहेत. त्यांचा पक्ष भाजपा त्यापेक्षा वेगळा विक्रम यंदाच्या निवडणुकीत करु पाहतो आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात एकदाच कोणत्या पक्षाला ४०० पेक्षा जास्त खासदार मिळाले आहेत. १९८४ मध्ये राजीव गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसला ४१४ खासदार मिळाले होते. आता भाजपा या ४०० च्या आकड्याला गवसणी घालू पाहतं आहे आणि त्यासाठीच त्यांनी या निवडणुकीत नारा दिला, अबकी बार ४०० पार असा इतिहास घडवू पाहणाऱ्या भाजपाला त्यांच्या आत्मविश्वासाची काही कारणं वाटतात. पहिलं म्हणजे मोदींची लोकप्रियता. ही संपूर्ण निवडणूक भाजपा मोदींच्या चेह्ऱ्यावरच लढली. मोदींनी देशभरात २०० हून अधिक निवडणुकीच्या सभा वा



कार्यक्रम केले आणि तब्बल ८० विविध मुलाखती दिल्या.यंदाच्या निवडणुकीत गेल्या दोन निवडणुकींसारखी मोदी लाट नव्हती असा उच्चार वारंवार झाला. ती होती की नव्हती आणि दहा वर्षांनंतरही मोदींची लोकप्रियता किती टिकून आहे, ते या निकालांमध्ये समजेल. निवडणुकांमधल्या यशाचं मुख्य कारण राहिलं आहे भारतीय राजकारणात बहुसंख्याकवाद किंवा हिंदुत्ववादाचा बनलेला मुख्य प्रवाह. धर्मनिरपेक्षता किंवा अल्पसंख्याक याबद्दल घेतलेली उघड भूमिका, धर्माचा राजकारणातला सढळ वापर हे सगळ्यांच्या समोर आहे. या राजकारणाचं सर्वोच्च प्रतीक म्हणजे अयोध्येचं राममंदिर. त्याच्या आंदोलनापासून भाजपाचा राजकीय प्रभाव संख्येतही वाढत गेला. राममंदिर पूर्ण झाल्यानंतर होणारी ही पहिली निवडणूक आहे. त्याचा भरपूर उपयोग भाजपानं प्रचारातही केला. त्यामुळेच रामंदिराचा प्रभाव या निवडणुकीत कसा दिसतो, हा महत्वाचा प्रश्न आहे. कलम ३७० रद्द करुन काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करणं आणि राममंदिर उभारणं ही भाजपाच्या जाहीरनाम्यतली जुनी वचनं पूर्ण झाली आहेत. समान नागरी कायद्याची चर्चा उत्तराखंडपासून पक्षानं सुरु केली आहे. त्यामुळे ही निवडणूक भाजपाची कोअर वचनपूर्तीची परीक्षा आहे. गेल्या दोन निवडणुकांमध्येभाजपानं नवीन किंवा पहिल्या मतदारांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला होता.

## स्वामी समर्थ महाराजांच्या केंद्रात चोरी करणाऱ्या चोरट्यांना शहर पोलिसांनी अवघ्या दोन तासात ठोकल्या बेड्या

जनसंचलन/बुलढाणा

चोरट्यांनी आता तर हद्दच केली आतापर्यंत लोकांना त्रास देत होते मात्र आता तर देवांना सुद्धा चोरट्यांनी सोडली नाही. असाच एक प्रकार बुलढाणा शहरात घडला आहे सरस्वती नगर येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ महाराज केंद्रात चोरट्यांनी हात घातला व हजारो किमतीचे मुद्देमाल लंपास केला ही घटना २ जून रात्री ८:३० ते ३ जून सकाळी ६:३० वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी स्वामी समर्थ केंद्राचे अध्यक्ष शांताराम लक्ष्मण जंजाळकर यांनी ३ जून रोजी बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली. दिलेल्या तक्रारीनुसार स्वामी समर्थ महाराज केंद्रातील स्वामी समर्थ महाराजांची पितळ्याची ४ किलो वजनाची मूर्ती किंमत १२ हजार रुपये, अष्ट धातूची महादेवाची पिंड साडेचार किलो वजनाची किंमत १३ हजार रुपये, चांदीचे वीस तोळे वजनाचे झुंबर किंमत २२ हजार रुपये, अष्ट धातूच्या दोन हत्तीच्या मुर्त्या किंमत २ हजार रुपये, गाईची अष्टधातूची मूर्ती किंमत १००० रुपये, पितळी घंटा ५०० रुपये, पितळे तीर्थ जरी चार किलो वजनाचे किंमत ३ हजार रुपये, तांब्याची संध्या पत्र किंमत १ हजार रुपये, तांब्याचे दोन गडवे ५०० रुपये, स्टीलचे दोन ताट किंमत २०० रुपये असा एकूण ५५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला होता. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे, व बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नरेंद्र ठाकरे हे घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करून घटनेची सविस्तर माहिती जाणून घेऊन परिसरातील लोकांना विचारपूस करून गोपनीय यंत्रणा कार्यान्वित केली व अवघ्या दोन तासात स्वामी समर्थ महाराज केंद्रात चोरी करणाऱ्या त्या चोरट्यांना ताब्यात घेऊन गुन्ह्यायातील चोरी गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त केला.

बुलडाणा जिल्हा लोकसभा मत मोजणी
सिटी न्यूज
वसा जनसेवेचा
बुलडाणा लोकसभा निवडणूक 2024
04/06/24 सकाळी 8 वा.पासून
होणाऱ्या प्रत्येक फेरीची मतांची मोजणी
"सिटी डिजिटल" चॅनल नंबर '81' व
युट्युब City News Buldana
वर थेट प्रक्षेपण
दैनिक जनसंचलन
व्यापक जन चळवळीचा प्रहरी !
संपर्क कारंजा चौक शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा 443001

# सापडलेले पैशांचे पाकीट, घडी दिली परत !



जनसंचलन/ देऊळगावराजा

प्रमाणिकपणा अजूनही शिल्लक असल्याची प्रचिती देऊळगावराजा येथे आली. रात्रीच्या वेळेस सामसूम रस्त्यावर सापडलेले पैशाचे पाकीट एका व्यक्तीने पोलिसांच्या साक्षीने दि. २ जून रोजी समोरील व्यक्तीस परत केले. देऊळगावराजा येथील रहिवासी अजिमखान हकीमखान हे १ जूनच्या रात्री ११ वाजेच्या सुमारास स्थानिक बसस्थानक चौकातून आइस्क्रीमचा आस्वाद घेऊन घरी परतत होते. दरम्यान, स्थानिक संतोष चित्र मंदिर चौकातील मदिना कॉम्प्लेक्ससमोरील रस्त्याच्या कडेला त्यांना एक पाकीट दिसले. पाकीट उचलून घेतल्यानंतर त्यांनी ते उघडून पाहिले असता त्यामध्ये त्यांना आधारकार्ड व पाच एटीएम कार्ड आढळून आले. तसेच नगदी १८०० रुपये व घडी करून ठेवलेली कागदपत्रे दिसली. त्यांनी आजूबाजूला पाहिले; परंतु त्या ठिकाणी कोणीही दिसले नाही. दुसऱ्या दिवशी २ जून रोजी त्यांनी सकाळीच पोलिस स्टेशन गाठले. या पाकिटाबद्दल ठाणेदार संतोष महल्ले यांना कल्पना देऊन त्यांनी ते पाकीट ठाणेदारांकडे सुपूर्द केले. ठाणेदारांनी आधारकार्ड पाहिले असता त्यावर श्रीकांत श्रीकृष्ण देशपांडे असे नाव व मारोती मंदिरासमोर, गारखेडा परिसर, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) असा पत्ता होता. त्यांच्याशी संपर्क करून महल्ले यांनी ते पाकीट त्यातील रोख रक्कम व कागदपत्र अजिमखान यांच्या हस्ते श्रीकांत देशपांडे यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी सर्वांनीच अजिमखान यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले.

# शॉर्ट सर्किटमुळे सव्वा एकरातील ऊस जळाला!

## शेतकऱ्याचे अंदाजे अडीच लाखांचे नुकसान

जनसंचलन/ देऊळगावराजा

देऊळगाव राजा शेतातून गेलेल्या लघुदाब विद्युत वाहिनीतून झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे देऊळगाव मही शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतातील सव्वा एकर ऊस जळाल्याची घटना १ जून रोजी घडली. विद्युत वितरण कंपनीचे अभियंता यांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे. देऊळगाव मही येथील ज्ञानबा गबाजी शिंगणे यांची देऊळगाव मही शिवारात शेती आहे. गट नं १३०/६ व १३१/१ अडीच एकर क्षेत्रावर त्यांनी उसाची लागवड केली होती. सदर ऊस तोडणीला आलेला असताना १ जून रोजी ऊस पिकाच्या क्षेत्रावरून गेलेल्या लघु विद्युत दाब वाहिनीतून शॉर्ट सर्किट होऊन उसाला आग लागली. यात सुमारे एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाला. शेतकऱ्याचे सुमारे दोन ते अडीच लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान विद्युत वितरण कंपनीचे अभियंता गणेश रामदास वीर यांनी घटनास्थळी महावितरणचे दुर्लक्ष गाव शिवारामध्ये गेल्या कित्येक वर्षांच्या जुन्या विद्युत वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. अनेक ठिकाणी विद्युत पोलचे निष्कर्षण (कालमर्यादा) संपलेली असताना त्याकडे महावितरणचे पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. लोंबकळणाऱ्या तारांमुळे आगीच्या घटना घडत असून महावितरणने याची दखल घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. पंचनामा केला असून विद्युत वितरण कंपनीने झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकरी ज्ञानबा शिंगणे यांनी केली आहे. तालुक्यात तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून या आठवड्यात मेव्हणा राजा व देऊळगाव मही शिवारात ऊस पिकाला आग लागल्याच्या दोन घटना घडल्या आहेत.

# दोन भावांच्या अंगावर वीज तार पडली, एकाचा मृत्यू



जनसचंलन/खामगाव

ऐन पेरणीच्या तोंडावर शेती मशागतीचे काम करण्याासाठी गेलेल्या दोन भावांच्या अंगावर जिवंत विद्युत तार पडल्याने त्यापैकी एकाच मृत्यू झाला. दुसरा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना खामगाव तालुक्यातील श्रीधरनगर येथे रविवारी दुपारी दोन वाजता घडली. लवकरच पेरणी करावी लागणार आहे. त्यासाठी शेती मशागतीच्या कामांना वेग आला आहे. तालुक्यातील श्रीधरनगर येथील शेतकरी मधुकर भावसिंग चव्हाण (३६), सुधाकर भावसिंग चव्हाण (२६) हे दोघे त्यांच्या शेतात मशागतीचे काम करीत होते. त्यावेळी त्यांच्या शेतातून गेलेली विद्युत वाहिनीची तार तुटून अचानक त्यांच् अंगावर पडली. या घटनेत मधुक चव्हाण या शेतकऱ्याचा जागीच मृत झाला. तर दुसरा भाऊ सुधाकर चव्हा हा गंभीर स्वरूपात जखमी झाला. चक्रीवादळामुळे तारा झाल्या धोकादायक तालुक्यात गेल्या रविवारी झालेल्या चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी महावितरणचे विद्युत खांब व तारा तुटून पडल्या. श्रीधरनगर भागातील शेतशिवारातही वादळीवाऱ्याचा फटका बसला. अनेक विद्युत तारा लोंबकळल्या. मृत शेतकरी मधुकर चव्हाण यांच्या शेतातही वीज तारा लोंबकळलेल्या असल्याने हा अपघा घडल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मतमोजणी केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी मंगळवार, दि. ४ जून रोजी सकाळी ८ वाजल्यापासून सुरू होणार आहे. मलकापूर रोडवरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ही मतमोजणी होणार आहे. या परिसरातील २०० मीटर परिक्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीची मतमोजणी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे. ही प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तसेच मतमोजणीच्या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी मतमोजणी परिसरातील २०० मीटर परिक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना प्राप्त अधिकारानुसार दि. ४ जून २०२४ रोजी सकाळी ६ वाजल्यापासून ते मतमोजणीचे काम पूर्ण होईपर्यंत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या २०० मीटर परिक्षेत्रात ५ पेक्षा जास्त लोकांनी एकत्र येवून जमाव करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.




यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ लागू करण्यात आले आहे. सदर आदेश अधिकारी, कर्मचारी, पोलिस अधिकारी, सुरक्षा पथकातील कर्मचारी तसेच अंत्ययात्रा, लग्नसोहळा, धार्मिक कार्यक्रमांना लागू राहणार नाही.

# ब्युटी पार्लर प्रशिक्षणाचा समारोप...

जनसंचलन/बुलडाणा





ग्रामीण विकास मंत्रालय आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या सेंट ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेतील ब्युटी पार्लर प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के के. सिंग अध्यक्षस्थानी होते. यावेळी आरसेटी संचालक संदीप पोटे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक म्हणून रूपाली शिंदे होत्या. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थ्यांना मोफत निवासी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या प्रशिक्षणात ३५ प्रशिक्षणार्थींनी सहभागी नोंदविला. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग यांनी, आरसेटी मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणातून प्रशिक्षण घेतल्यास, कमी भांडवलात चांगला व्यवसाय सुरू करता येतो. तसेच कमी खर्चात चांगला नफा मिळवता येतो. प्रशिक्षणार्थींनी व्यवसायातील समस्यांवर उपाय शोधण्याचे आवाहन केले. श्री. पोटे यांनी, आरसेटीचा मुख्य उद्देश कला समृद्ध लोकांना त्यांच्या कलेची जाणीव करून देणे आणि त्यांना मदत करणे हा आहे. त्यांनी त्यांच्या कलेमध्ये पारंगत होऊन स्वयंरोजगार मिळावा, यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे सांगितले. ब्युटी पार्लर प्रशिक्षणात मॅनिक्युअर, फेशियल, वॅक्सिंग, थ्रेडिंग, हेअर कटींग, हेअर मसाज, ब्रायडल मेकअप, मेहंदी, नेलआर्ट, ब्लिचिंग, स्पा, हायलाईट याविषयी प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक स्वप्नील गवई, श्रीकृष्ण राजगुरे, सहाय्यक मनिषा देव, प्रशांत उबरहंडे, कल्पना पोपळघट यांनी सहाय्य केले.

# सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा

सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेसाठी पात्र खेळाडूंनी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धेचे आयोजन दि. ४ ते ६ जुलै दरम्यान करण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने तसेच सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स् एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्यातर्फे सन २०२४-२५ या वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप (सबज्युनिअर मुले, ज्युनिअर मुले/मुली) या क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम क्रीडा संचालनालय, पुणे यांना प्राप्त आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा अंतर्गत सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंकरीता सबज्युनिअर १५ वर्षाआतील मुले क्रीडा स्पर्धा मुले वयोगटासाठी दि. १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनिअर १७ वर्षाखालील मुले व मुली दि. १ जानेवारी २००८ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनिअर, ज्युनिअर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच . या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे ऑफलाईन नोंदणी दि. २९ जून २०२४ पर्यंत करणे आवश्यक आहे. स्पर्धेत सहभागी खेळाडूंकडे जन्मदाखला, आधारकार्ड व पासपोर्ट सर्व मूळ प्रतीत असणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. यात खेळाडू अधिक वयाचा दाखला आढळल्यास संपूर्ण संघ बाद करण्यात येणार आहे. स्पर्धेचे आयोजन हे १५ वर्षाआतील मुले सबज्युनिअर दि. ४ जुलै २०२४, १७ वर्षाआतील मुले ज्युनिअर दि. ५ जुलै २०२४, १७ वर्षाआतील मुली ज्युनिअर दि. ६ जुलै २०२४ करण्यात येणार आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपूर्ण नाव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नाव, पत्ता, शाळेचा युडायस क्रमांक, खेळाडू स्वाक्षरी, रजिस्टर क्रमांक, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख, मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने पाठवावे. १५ वर्षाआतील खेळाडूंकरीता वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. जिल्ह्यातील शाळा, संघांनी सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी करावी आणि . या संकेतस्थळावर नोंदणी करुन शाळांनी सहभागी व्हावे, याबाबत अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांच्याशी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांनी केले आहे.



# शांतता भंग कराल तर होईल कडक कारवाई किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांचा इशारा




जनसंचलन/ सिंदखेडराजा

पोलीस ठाणे किनगाव राजा जिल्हा बुलढाणा हद्दीतील सुजाण नागरिकांना याद्वारे पोलीस ठाणे किनगाव राजा वतीने जाहीर आवाहन करण्यात येते की लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १०/०३/२०२४ पासून ते दिनांक ०६/०६/२०२४ रोजी पावेतो आदर्श आचारसंहिता अंमलात असून बुलढाणा सह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या,जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत. तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डीजे वाजवणार नाहीत.तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये. व्हाट्सअप ग्रुपचे ॲडमिन यांनी दिनांक ०३/०६/२०२४ ते दिनांक ०६/०६/२०२४ या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाहीत जर ॲडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप ॲडमिन ला जबाबदार धरून योग्य ती कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. असे आवाहन किनगाव राजा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार मा. श्री विनोद नरवाडे साहेब यांनी केले आहे.

# महाराष्ट्रात भीषण दुष्काळ, जनतेचे हाल पाहून स्वस्थ राहू शकत नाही- शरद पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र





**वृत्तसंस्था/ मुंबई**

राज्यातील दुष्काळासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. दुष्काळाच्या बैठकीला मंत्री गैरहजर होते. मंत्र्यांच्या गैरहजेरीची दखल घेतलीच असेल, असे शरद पवार यांनी आपल्या पत्रात नमूद केलं आहे. तसेच आश्वासक बदल न झाल्यास संघर्ष होईल, असा इशारा शरद पवार यांनी आपल्या पत्रातून दिला आहे. शरद पवार म्हणाले की, राज्यात दुष्काळामुळे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. पाण्याच्या टंचाईमुळे बळीराजा आणि सर्वसामान्य त्रस्त झाले आहेत. जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याची कमतरता निर्माण झाली आहे. अशा स्थितीत या भीषणतेकडे राज्य सरकारचे लक्ष वेधूनही राज्य सरकारकडून कुठलीही ठोस भूमिका अद्याप घेण्यात आलेली नाही. जर ही दुष्काळाची स्थिती राज्यात कायम राहिली आणि जर राज्य सरकारकडून तातडीने पावलं उचलली गेली नाहीत तर, महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी नक्कीच संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील दुष्काळ निवारणाबाबत योग्य कार्यवाही करावी, अशी अपेक्षा पत्रातून शरद पवार यांनी व्यक्त केली आहे.पुढे शरद पवार म्हणाले की, मागील महिन्यात २४ मे रोजी मी पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्र राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. सदर पत्रकार परिषदेते मी राज्य सरकारशी सहकार्य करण्याची आणि दुष्काळी परिस्थितीला एकत्रितपणे सामोरे जाण्याची भूमिका घेतली होती. आपण देखील आदल्या दिवशी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला होता. परंतू ह्या महत्वपूर्ण बैठकीत संबंधित लोकप्रतिनिधी व मंत्री गैरहजर होते. आपण सदर बाबीची योग्य ती दखल घेतली असेलच. मात्र राज्य सरकार अद्यापही अंग झटकून कामाला लागल्याचे दिसत नाही, हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.वर सविस्तर लिहिताना शरद पवार म्हणाले की, मागील दहा दिवसांत दुष्काळी परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. राज्यातील उजनी, जायकवाडी सारखी महत्वाची धरणे आटली आहेत. संपूर्ण मराठवाडा दुष्काळात होर-पळत आहे. त्याची झळ लगतच्या उत्तर महाराष्ट्र, विदर्भ विभागाला देखील बसली आहे. धुळे, नंदूरबार, नाशिक, जळगांव, सोलापूर, अहमदनगर, यवतमाळ, अकोला, बुलढाणा जिल्ह्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील जनता पाण्यासाठी तहानलेली आहे. मराठवाड्यासह पुणे जिल्ह्यातील पुरंदर, दौंड, बारामती, इंदापूर, सातारा जिल्ह्यातील माण-खटाव, कोरेगाव आणि सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी ह्या तालुक्यातील पाणी टंचाई परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. याकडे शरद पवार यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले.पाण्याच्या समस्येकडे लक्ष वेधताना पवार म्हणाले, मागील वर्षी राज्यात केवळ अकराशे टँकर्स होते. आजमितीस ती संख्या ११ हजारांच्या वर गेली असून टँकर्ससाठी पाणी भरण्याचे स्त्रोत शोधावे लागत आहेत. जनावरांना चारा आणि पाणी मिळणे कठीण झाले असून राज्यातील पशूधन धोक्यात आले आहे. पाण्याअभावी फळबागांची परिस्थिती बिकट झाली असून राज्य शासनाने फळबागा वाचविण्यासाठी अद्याप काहीच प्रयत्न केल्याचे दिसत नाही. दुष्काळ निवारणाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचल्या नाहीत. राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीने हवालदिल झालेल्या जनतेला दिलासा देण्यासाठी नवीन काही उपाययोजना देखील हाती घेतल्या नाहीत. हे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते, असे पवार म्हणाले.दुष्काळी परिस्थिती हाताळताना मी राज्य सरकारशी सातत्याने सहकार्याची भूमिका घेत आलो आहे. परंतू ह्या भीषण दुष्काळी परिस्थितीत जनतेचे हाल पाहून स्वस्थ राहणे कठीण झाले आहे. दुष्काळ निवारणाच्या कामात राज्य सरकारने तातडीने पावले उचलावीत असे मी आवाहन करतो. मात्र त्यानंतरही काही आश्व-ासक बदल न दिसल्यास मला संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल, हे स्पष्टपणे नमूद करतो, असा इशारा शरद पवार यांनी दिला आहे.

## कार-दुचाकीचा अपघात एक ठार, दुसरा गंभीर जखमी...

**जनसचंलन/ साखरखेर्डा**

मेहकर-साखरखेर्डा मार्गावर गुंज फाट्याजवळ कार आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये मेहकर तालुक्यातील जानेफळ जवळील वाडी येथील गजानन कवर हे ठार झाले, तर एकजण जखमी झाला. हा अपघात १ जूनला झाला. गजानन नायबराव कवर (वय ५०) आणि तुळशीराम किसन आडवे (७०) हे दोघे शिंदी येथे ज्ञानेश्वर खरात यांच्याकडे आले होते. शिंदी येथून वाडी येथे दुचाकी (एमएच-२८-एए-०४९५) ने जात असताना मेहकरकडून बिबी येथे मंगेश बाजड (रा. मेहकर) हे कार (एमएच-१६-एबी-४१८) ने जात होते. दरम्यान, गुंज फाट्याजवळ दोन वाहनांची जोरदार धडक झाली. या अपघातात दुचाकीवरील दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने साखरखेर्डा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेद्वारे मेहकर येथील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, गजानन कवर (रा. वाडी) यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तुळशीराम किसन आडवे हे गंभीर जखमी आहेत. गजानन कवर यांच्या अपघाताची माहिती मिळताच शिंदीचे माजी सरपंच विनोद खरात, ज्ञानेश्वर खरात यांनी घटनास्थळी जाऊन मदत केली.

## जिल्ह्यातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत !

**जनसचंलन/बुलडाणा**



जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतीची मशागत करून ठेवली आहे. जून महिना सुरू झाल्याने शेतकरी आता पावसाच्या प्रतिक्षेत आहे. राज्यात लवकरच मान्सून-चे आगमन होईल. यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे, खते खरेदी करून ठेवली आहे. जून महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात पेरणी झाल्यास उत्पन्न चांगले येते असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई चोरी गेलेल्या ७३ मोबाईलचा लावला शोध

### मूळ मालकास मालमत्ता परत करण्याचा बुलढाणा पोलिसांचा अभिनव उपक्रम

**जनसंचलन/बुलढाणा**



चोरट्याने सर्वच ठिकाणी धुमाकूळ घातला आहे. जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन परिसरात भरणाऱ्या आठवडी बाजारात भर दिवसा मोबाईल हरवल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहे. सदर घटनेकडे जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सदर घटनेची गांभीरतेने दखल घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांना तांत्रिक विश्लेषण विभाग सायबर लॅब यांच्याकडून जिल्हा पोलीस घटकात हरवलेल्या गहाळ झालेल्या मोबाईल संबंधित ची माहिती प्राप्त करून घेतली व मोबाईलचा शोध घेण्याचा आदेश सुद्धा जाहीर केला. स्थानिक गुन्हे शाखेने या तपासात गती वाढवली. पोलीस निरीक्षक अश-ोक लांडे यांनी पो.हे.का. गजानन माळी,पो.कॉ. सुभाष वाघमारे यांचे पथक तयार करून तांत्रिक विश्ले-षण विभाग सायबर लॅब बुलढाणा यांच्याकडून मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे सदर पथकाने जिल्ह्यातील तब्बल ७३ चोरी गेलेल्या मोबाईलचा तपास लावला. स्थानिक गुन्हे शाखेने हस्तगत केलेले मोबाईल संबंधित मूळ मालकास परत करण्याच्या हेतूने जिल्हा पो-लीस अधीक्षक कार्यालय बुलढाणा येथे मोबाईल वाटप संदर्भातील विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांच्या हस्ते मोबाईल संबंधित मूळ मालकास परत करण्यात आलेले आहे. ही धडाकेबाज कारवाई जिल्हा पो-लीस अधीक्षक सुनील कडासने व अप्पर पोलीस अधीक्षक महामुनी अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या आदे-शानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास कुमार सानप पो.हे.कॉ गजानन माळी,पो.कॉ. सुभाष वाघमारे, तांत्रिक विश्लेषण विभाग सायबर लॅब चे राजू आडवे, पवन मखमले, कैलास ठोंबरे, ऋषिकेश खंडेराव, उषा वाघ यांच्या पथकाने मोबाईलचा शोध घेऊन ७३ गहाळ झालेल्या मोबाईल विविध ठिकाणाहून एकत्र तर मूळ मालकास परत करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे.